# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१३ जानेवारी, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथील टीव्ही शोरूममधील चोरीचा गुन्हा अवघ्या काही तासातच उघड गुन्हे शोध पथकाची विशेष कामगीरी

दिनांक १२/०२/२०२० रोजी फिर्यादी नामे राजीव रविशंकर व्यास रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे रिपोर्ट दिली कि, त्यांचे प्रिंस इलेक्ट्रीक दुकानाचे गोदाममधुन कोणीतरी अज्ञात इसमाने ७ नग टीव्ही किं. १,९३,२२३/—रू चा मुद्देमाल चोरून नेला अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. १२९/२०२० कलम ४६१,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा नोंद होताच गुन्हयाचा तपास गुन्हे शोध पथकाकडे सोपाविण्यात आला. गुन्हे शोध पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थही भेट दिली आणि तपास सुरू केला. शहरातील टीव्ही विकणारे, फिटींग करणारे, दुरूस्ती करणारे या सगळयांना विचारपुस करण्यात आली. तपासादरम्यान गोपनीय माहितीवरून त्याच दुकानात एका वर्षापुर्वी काम करणाऱ्या इसमास संशयावरून ताब्यात घेण्यात आले. सदर इसमास गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्याने कबुली दिली की, त्यानेच दिनांक १२/०२/२०२० रोजी प्रिंस इलेक्ट्रीकच्या गोदामामध्ये चोरी केली होती. यावरून सदर आरोपीस अटक करून आरोपीच्या ताब्यातुन गुन्हयात चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढिल तपास चंद्रपुर शहर पोलीस करीत असुन सदरचा गुन्हा अवघ्या काही तासातच उघडकीस आणण्यास चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथकाने अथक परिश्रम घेतले.

सदरची कार्यवाही अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक श्री. चंद्रशेखर बहादुरे, यांचे नेतृत्वात सफौ. बाबा डोमकावडे, पोहवा. महेंद्र बेसरकर, स्वामी चालेकर, विलास निकोडे, शरीफ शेख, किशोर तुमराम, सिध्दार्थ रंगारी, पोना. पांडुरंग वाघमोडे, रामकृष्ण सानप, पोशि. प्रमोद डोंगरे, मंगेश, सचिन बुटले यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

---

# पोलीस स्टेशन दुर्गापुर येथील चोरीचा गुन्हा उघड
# तिन आरोपीसह चोरीचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०५/०२/२०२० रोजी विद्या मंदीर हायस्कुल उर्जानगर येथील महिला प्राध्यापक फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे रिपोर्ट दिली कि, त्यांचे शाळेतील एक सीसीटीव्ही डिवीआर मशीन, एक स्पिकर, एक मॉनीटर असा एकुण १४,१००/—रू चा मुद्देमाल कोणीतरी चोरून नेला अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. ४५/२०२० कलम ४५७,३८०,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा नोंद होताच गुन्हयाचा तपास सुरू करण्यात आला. तांत्रीक विश्लेषण आणि इतर माहितीच्या आधारे तपासास गती देण्यात आली. अखेर गोपनीय सुत्राद्वारे माहिती मिळाली की, तिन इसम दुर्गापुर परिसरात मार्केट मध्ये चोरीकेलेले साहित्य विक्री करण्याकरीता येणार आहे. यावरून दुर्गापुर येथील पोलीस पथकाने सापळा रचुन संशयावरून तिन इसमांना ताब्यात घेतले. सखोल आणि कसुन चौकशी केली असता आरोपी नामे १) राकेश मधुकर मेश्राम वय २५ रा. मेजरगेट दुर्गापुर, २) प्रभाकर विठठ्ल हेलवडे वय २९ रा. खैरगाव, ३) विपीन राजकुमार कातकर वय २७ रा. उर्जानगर यांनी कबुली दिली की, त्यांनीच दिनांक ०५/०२/२०२० रोजी विद्या मंदीर शाळेत चोरी केली होती. यावरून आरोपीतांकडुन चोरीस गेलेला माल एक सीसीटीव्ही डिवीआर मशीन, एक स्पिकर, एक मॉनीटर आणि गुन्हयात वापरलेली दोन मोटारसायकल, आणि मोबाईल फोन असा एकुण १,२५,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढिल तपास दुर्गापुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक श्री. खोब्रागडे यांचे नेतृत्वात पोउपनि. सोनोने, पोहवा. गौरकार, मंजुळकर, पोना. उमेश वाघमारे, पोशि. संदीप दुर्योधन, आडे यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

---

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१३ जानेवारी, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7276494810 (PRO)


## श्रीराम समर्थ मल्टीस्टेट ॲग्रो पर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटी मध्ये गुंतवणुक करणाऱ्या ग्राहकांना चंद्रपुर पोलीसांतर्फे सुचना

चंद्रपुर जिल्हयात श्रीराम समर्थ मल्टीस्टेट ॲग्रो पर्पज कोऑपरेटिव्ह सोसायटी मध्ये ग्राहकांची फसवणुक झाल्याबाबत फिर्यादी नामे सुभाष दत्ताजी शिरटकर वय ३६ रा. थुटरा, गडचांदुर, जि. चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे दिलेल्या तक्रारीवरून अप.क्र. १०१२/२०१९ कलम ४०६, ४०९, ४२०, १२०(ब) भादंवि सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास हा मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांचे कडे सोपाविण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा उलगडा लावण्यासाठी पुरावा गोळा करण्यासाठी आणि पुढिल तपासाकरीता ज्या गुंतवणुकदारांनी या संस्थेत गुंतवणुक केली आहे त्यांनी त्यांचे सर्टिफिकेट, आधार कार्ड, पॅन कार्ड, बॅक अकाउंट पासबुक झेरॉक्स प्रत आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपर येथे तात्काळ जमा करावे. याची सर्व गुंतवणुकदारांनी नोंद घ्यावी. संपर्काकरीता आर्थीक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपुर येथे संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक **07172-273258**

———————————————————————————————